# मंत्रिमंडळ निर्णय

१ जून २०१४

( मंत्रिमंडळ बैठक क्र.१६३)

| क्र. | विषय | विभाग |
|---|---|---|
| १ | राज्य शासकीय कर्मचाऱ्यांना वाढीव वाहतूक भत्ता | वित्त |
| २ | ८० वर्षांवरील निवृत्तीवेतनधारकांना दहा टक्के वाढ | वित्त |
| ३ | शेती महामंडळाच्या कर्मचाऱ्यांना पाचवा वेतन आयोग कायम कामगारांना देखील समकक्ष वेतनश्रेणी लागू | महसूल |

वित्त विभाग

## राज्य शासकीय कर्मचाऱ्यांना वाढीव वाहतूक भत्ता

राज्य शासकीय अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना १ एप्रिल २०१४ पासून वाढीव दराने वाहतूक भत्ता देण्याचा निर्णय आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला.

५४०० रूपये किंवा त्याहून अधिक ग्रेड पे असलेल्या कर्मचाऱ्यांना अ-१ व अ वर्ग शहरांसाठी २ हजार ४०० रूपये तर इतर ठिकाणांसाठी १ हजार २०० रूपये दरमहा देण्यात येतील. ग्रेड पे ४४०० ते ५४०० रूपये असणाऱ्या कर्मचाऱ्यांना अ-१ व अ वर्ग शहरांसाठी १ हजार २०० रूपये तर इतर ठिकाणांसाठी ६०० रूपये व ४४०० पेक्षा कमी ग्रेड पे असणाऱ्या कर्मचाऱ्यांना सर्व शहरांसाठी ४०० रूपये असा वाहतूक भत्ता देण्यात येईल.

**अपंग कर्मचाऱ्यांसाठी दुप्पट वाहतूक भत्ता**

अंध, अस्थिव्यंग आणि पाठीच्या कण्याच्या विकाराने पिडीत असणाऱ्या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना खालील प्रमाणे वाढीव वाहतूक भत्ता देण्यात येईल.

५४०० रूपये किंवा त्याहून अधिक ग्रेड पे असलेल्या कर्मचाऱ्यांना अ-१ व अ वर्ग शहरांसाठी ४ हजार ८०० रूपये तर इतर ठिकाणांसाठी २ हजार ४०० रूपये दरमहा देण्यात येतील. ग्रेड पे ४४०० ते ५४०० रूपये असणाऱ्या कर्मचाऱ्यांना अ-१ व अ वर्ग शहरांसाठी २ हजार ४०० रूपये तर इतर ठिकाणांसाठी २००० रूपये व ४४०० पेक्षा कमी ग्रेड पे असणाऱ्या कर्मचाऱ्यांना सर्व शहरांसाठी २००० रूपये असा वाहतूक भत्ता देण्यात येईल.

-----०-----

वित्त विभाग

## ८० वर्षांवरील निवृत्तीवेतनधारकांना दहा टक्के वाढ

८० वर्षावरील निवृत्तीवेतनधारक किंवा कुटुंब निवृत्तीवेतनधारकांच्या मुळ निवृत्ती वेतनात १ एप्रिल २०१४ पासून १० टक्के वाढ करण्याचा निर्णय आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. या निर्णयाचा लाभ राज्य शासन, जिल्हा परिषद तसेच कृषी आणि कृषीतर शैक्षणिक संस्थांतून निवृत्त झालेल्या सुमारे एक लाख सेवानिवृत्तीधारकांना होणार आहे.

सहाव्या वेतन आयोगाच्या अनुषंगाने ही अतिरिक्त वाढ मंजूर करण्यात आली आहे. निवृत्तीवेतनधारकांच्या संघटनांकडून वारंवार शासनाकडे याबाबत मागणी करण्यात येत होती. वाढती महागाई व वृद्धत्वामुळे आजारपणावर होणारा वैद्यकीय खर्च लक्षात घेता हा निर्णय घेण्यात आला. या निर्णयामुळे राज्यावर अंदाजे १० कोटी रूपये एवढा अतिरिक्त मासिक भार पडेल.

-----०----

महसूल विभाग

## शेती महामंडळाच्या कर्मचाऱ्यांना पाचवा वेतन आयोग
## कायम कामगारांना देखील समकक्ष वेतनश्रेणी लागू

महाराष्ट्र राज्य शेती महामंडळाच्या स्थायी अधिकारी, कर्मचारी व कामगारांना १ जानेवारी १९९६ पासून पाचवा वेतन आयोग लागू करण्याचा निर्णय आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. हे वाढीव वेतन १ जानेवारी २००८ पासून देण्यात येतील. या निर्णयाचा लाभ ८१५ अधिकारी, कर्मचारी व कामगारांना मिळेल.

सध्या महामंडळाच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांना चौथ्या वेतन आयोगानुसार वेतन व भत्ते दिले जातात.

वर्ष २००८ पासूनची फरकाची रक्कम १६ कोटी ७२ लाख असून यापुढे २ कोटी १३ लाख वार्षिक अतिरिक्त खर्च येईल. हा खर्च महाराष्ट्र राज्य शेती महामंडळ स्वत:च्या उत्पन्नातून भागविणार आहे.

-----०-----